माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००२८००**

**अपिलार्थी श्री. शेखर मोकल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचडीआयएल टॉवर्स,
३ रा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार**
सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचडीआयएल टॉवर्स,
३ रा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०९.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०६.२०२५ | ३०.०६.२०२५ | १८.०७.२०२५ | ११.०९.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ११.११.२०२५ रोजीच्या अर्जांन्वये समाधान झालेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ३०.०६.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ११.०९.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०२.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"सर्व्हे नं. १७४, १७५ या खाजगी भुखंडावरील चाळ नं ५, टी. जे. रोड, शिवडी, मुंबई- ४०००१५ शेजारी असलेली पत्रा शेडला आपल्या सर्व्हे अधिकारी यांनी कुठल्या अधिकाराअंतर्गत सर्व्हे नं. SOU-FS-०५४/८५, असे नोंद केले आहे त्या संवधीत खालील प्रमाणे माहिती हवी आहे.*

*विषयांकीत सर्व्हे नं. १७४, १७५ या खाजगी भुखंडावरील चाळ नं. ५, टी. जे. रोड, शिवडी, मुंबई-४०००१५ शेजारी असलेली पत्रा शेडला आपल्या सर्व्हे अधिकारी यांनी कुठल्या अधिकाराअंतर्गन सर्व्हे नं. SOU-FS-०५४/८५, असे नोंद केले आहे त्याचे स्पष्टीकरण लिखित माहितीच्या साक्षांकीत छायांकीत प्रती हव्या आहेत."*

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ३०.०६.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, शासन धोरणाप्रमाणे ज्या-ज्या झोपडपट्टी समुहास, झोपडपट्टी समुह क्रमांक देण्यात आलेला आहे, त्या समुहातील झोपडी बांधकामाचे सर्वेक्षण करुन त्याला झोपडी बांधकाम अनुक्रमांक देण्यात आलेला आहे.

..२/-

४. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १८.०७.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०९.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती पुरविलेली आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे अधिवक्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, ज्या सर्व्हे क्र. SOU-FS-०५४/८५ असे नंबर देण्यात आले आहे, ती झोपडपट्टी घोषित क्षेत्रात नव्हे तर खाजगी मालकीची जमिनीवर आस्तित्वात आहे. तरीही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी नोटीस न देता नंबर दिले आहे. म्हणून माहिती अधिकार अंतर्गत माहिती विचारली होती.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ३१.०८.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, शासकीय धोरणानुसार सरकारी व खाजगी जमिनीवर झोपडपट्टी क्रमांक देण्यात आले आहे तसे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जर अपिलार्थींना त्यावर आक्षेप असेल तर त्यांनी संबंधीत प्राधिकरणाकडे अपील करणे आवश्यक आहे व त्यांनी अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०७.०९.२०२६**